भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.३१४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०६/०५/२०१७

**१) शेतातील विहीरीवर लावलेली मोटार पंप चोरी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ४/०५/२०१७ चे १८.०० वा. ते ५/०५/२०१७ चे १०.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी चे शेतातील विहीरीवर लावलेली एक लुबी मोना ट्राप कंपनीची २ हॉर्सपॉवरची मोटार पंप किंमती ८,४००/रू. यातील संशयीत आरोपीने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याचा संशय दर्शविल्याने फिर्यादी शैलेश सुंदरलाल भगत वय ४८ वर्ष, रा. येरली यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे. सिहोरा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. डोंगरे पो.स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

**२) हॉटेल समोर उभी ठेवलेली स्कॉरपीओ गाडी चोरून नेल्याने .गुन्हा नोंद :–**

दिनांक ०५/०५/२०१७ चे ००.३० ते ०९.०० वा दरम्यान यातील फिर्यादीचे मृतक मित्राचे स्कॉरपीओ गाडी क्र. पी.बी./०९ एफ ००५५ किं. २,०००००/रू. ची ही फिर्यादीचे हॉटेल समोर उभी करून ठेवली असता कुणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याने फिर्यादी गजानन पतीराम कुरंजेकर वय ३८ वर्ष, रा. संत कबीर वार्ड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे. भंडारा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि तोडासे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) घराचे समोरील दाराचा ताला तोडुन घरातील एलईडी टिव्ही चोरी केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ४/०५/२०१७ चे १८.०० ते दि. ०५/०५/२०१७ चे १४.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी विलास नामदेव दिवटे वय ३९ वर्ष, रा. महात्मा फुले कॉलनी भोजापुर हे परीवारासह घराला ताला लावुन आपले मुळ गावी सिल्ली येथे गेले असता कुणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन फिर्यादीचे घराचे समोरील दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करून घरातील १ एलजी. कंपनीचा ३२ इंच एलईडी. टिव्ही. किंमती १५,०००/–रु. चा चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. भंडारा येथे कलम ४५४,४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गायकवाड पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) लग्न कार्यातील प्रेझेन्ट आलेली एलईडी टिव्ही चोरी केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २१/०४/२०१७ चे १८.१५ ते २१.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी तेजराम मोतीराम गहाने वय ५१ वर्ष, रा. श्रीनगर कॉलोनी सेंदुरवाफा हे मुलीचे लग्नाचे कार्यक्रम विधी आटोपल्यानंतर आंदनात (प्रेझेंन्ट) आलेली सॅमसंग कंपनीची ३२ इंच काळया रंगाची एलईडी. टिव्ही. किंमती २२,९००/–रु. ची मंगलमुर्ती सभागृह सेंदुरवाफा येथुन कुणीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. साकोली येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भजने पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

**५) महाराष्ट्र राज्य विद्युत रोहीतत्रातील लागलेली जी. ओ. किटकॅट चोरी केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ५/०५/२०१७ चे ११.०० वा. दरम्यान यातील महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे विद्युत रोहीतत्रातील यातील आरोपीने विद्युत पुरवठा बंद करून विद्युत रोहीतत्रामध्ये लागलेली जी. ओ. किटकॅट १८ नग किं. ७,५६०/रू. चा माल कुणीही नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याने फिर्यादी प्रशांत श्रावनजी वांढरे वय ३३ वर्ष, रा. कनीष्ठ अभियंता विद्युत वितरण केंद्र पिंपळगाव यांचे लेखी रिपोर्ट वरुन पो. स्टे. लाखनी येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

६) पांढऱ्या रंगाची चार चाकी गाडी चालकाने निष्काळजीपणे चालवुन सायकल चालकाला धडक मारुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक ०५/०५/२०१७ चे १८.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी हा आपले सायकलने मनोज मेडीकल मध्ये जात असतांनी मागेहुन येणाऱ्या पांढऱ्या रंगाची चार चाकी गाडीचे आरोपी चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे सायकला धडक मारून त्यास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनि ताराम यांचे चौकशी वरुन पोस्टे. जवाहरनगर येथे कलम २७९,३३७, भांदवि. सहकलम १८४,१३४/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जनबंधु पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

७) बिमारीचे त्रासामुळे विहीरीचे पाण्यात बुडुन महिलेचा मृत्यु . :—

दिनांक ५/०५/२०१७ चे ०४.०० वा दरम्यान यातील मृतक सौ. सरस्वती सुखराम तितीरमारे वय ७५ वर्ष, रा. काटेबामनी ही टिबी निमोनिया मुळव्याद या आजाराने एक महीन्यापासुन बिमार असल्याने या रोगाला कंटाळुन विहीरीत उडी घेवुन पाण्यात बुडुन मरण पावल्याने फिर्यादी गुलाबराव बाजीराव तितीरमारे वय ६९ वर्ष रा. काटेबामनी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे तुमसर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. शहारे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहे

८) अवैध दारु अडयावर धाडी . :—

दिनांक ०५/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे. जवाहरनगर, वरठी, साकोली, पवनी, लाखांदुर येथे अवैध दारु अडयावर धाडी घालुन एकुण ०८ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन १५ लिटर हा.भ.दारू+ ३० किलो किंमती २,२५०/—रु, ५ लीटर ९४० मिली.लीटर देशी दारू किंमती १,६९०/—रु. असा एकुण किंमती ३,९४०/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक ०५/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुन १२३ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०४ तीन सिटर वाहनांवरती १३ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १०६ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

पोलीस अधिक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

PSI
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.